

MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR

माफसू

# यशोगाथा

## २०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव









# किरकोळ मासे विक्रेता ते यशस्वी मत्स्यसंवर्धक

श्री. दिवाकर मंडल हे देवीपूर, ता. आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथील शेतकरी असून ते रिकाम्या वेळेत मासे विक्री व्यवसाय करत असत. बिनभरवशाची शेती आणि मासे विक्रीतून मिळणारा अत्यल्प लाभ यामुळे श्री. दिवाकर मंडल सतत चिंतेत असत. याच काळात त्यांच्या गावातील एका प्रगत शेतकऱ्याने त्यांना मत्स्य संवर्धन या व्यवसायाबद्दल सुचविले. विदर्भातील मत्स्य व्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा शोध घेत असतांनाच श्री. मंडल यांना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालयाबद्दल माहिती मिळाली आणि सन २०१६ मध्ये महाविद्यालयात आयोजित ''गोडया पाण्यातील मत्स्य सवंर्धन'' या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात ते दाखल झाले. प्रशिक्षणादरम्यान श्री. मंडल यांना महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी शेततळयातील मत्स्य संवर्धनासाठी प्रोत्साहीत केले व प्रगत मत्स्य संवर्धनाविषयीचे मार्गदर्शन दिले. मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे श्री. मंडल यांनी सन २०१७-१८ या वर्षात ३००० वर्ग मीटर आकाराचा तलाव खोदून रोहू व कटला या माश्यांचे संवर्धन देवीपूर येथील आपल्या शेततलावात सुरू केले.

मत्स्य संवर्धनाकरीता तलावाची शास्त्रोक्त पद्धतीने बांधणी, मत्स्यबीज संचयन, खत व खाद्य यांचे व्यवस्थापन तसेच मत्स्य संवर्धनासंबंधी आवश्यक इतर तांत्रिक बाबींबाबत डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी वेळोवळी श्री. मंडल यांना मार्गदर्शन केले. यातुनच श्री. दिवाकर मंडल यांना सन २०१९-२० या वर्षात रोहू व कटला या माशांच्या मत्स्य संवर्धनातून २४०० किग्रॅ. उत्पादन मिळाले व रू. २,८८,०००/- इतकी रक्कम मासे विक्रीतून मिळाली. सदर मत्स्य संवर्धनातून वर्ष अखेरीस खर्च वजा जाता श्री. मंडल यांना रू. १,५०,०००/- इतक्या रक्कमेचा निव्वळ नफा मिळाला. मत्स्य संवर्धनामधील फायद्यामुळे श्री. दिवाकर मंडल यांनी आता साधारण ४००० मीटर वर्ग या क्षेत्रफळाचे दोन नविन तलाव तयार केले आहेत व त्यामध्ये पंगस व तिलापीया या प्रजातींचे मत्स्य संवर्धन ते सध्या करीत आहेत. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. प्रशांत तेलवेकर आणि त्यांचे इतर सहकारी श्री. दिवाकर मंडल यांना त्यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रशांत तेलवेकर व श्री. राजीव राठोड
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

श्री दिवाकर रविंद्र मंडल
देवीपूर, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
मो. ९६०४०८८६०५